UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

## Special Issue

Issue I, Vol II 10th February 2018

Editor in Chief

**Mr.Arun B. Godam**

www.rjournals.co.in

Scanned with CamScanner

ISSN : 2319 – 8648 **CURRENT GLOBAL REVIEWER**
Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue I Vol II , 10th Feb. 2018


| Public Adm | | | |
|---|---|---|---|
| 1 | Impact of New economic policy on Development | Dr. Prabhakar V. Aher | 129 |
| 2 | Urbanization in India | Dr. Magar S. R. | 131 |
| 3 | Globalization and Social policy in development context | Dr.B.M.Chavan | 135 |
| 4 | Indian Constitutional minority right & Globalization | Jadhav vs. | 138 |
| 5 | जागतिकीकरण आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या | डॉ. घायगुडे पो. एस. | 140 |
| 6 | जागतिक पर्यावरण : वायू प्रदूषण एक गंभीर समस्या | डॉ. प्रतिभा उन्हाळे | 147 |
| 7 | जागतिकीकरणात सार्वजनिक धोरणाची दिशा | डॉ. भालेराव जे.के. | 151 |
| 8 | जागतिकीकरण व मानवी मूल्य | डॉ. गोविंद येडले | 154 |
| 9 | जागतिकीकरणाचा भारतीय शिक्षणावरील परिणाम : एक चिकित्सा | डॉ. प्रमोद चव्हाण | 156 |
| 10 | जागतिकीकरणाचे भारतावरील परिणाम | डॉ. कल्पना हनुमंतराव घारगे | 159 |
| 11 | जागतिकीकरण: भारतीय सार्वजनिक उपक्रमातील निर्गुंतवणुक धोरण | डॉ.बाळासाहेब निर्मळ | 162 |
| 12 | जागतिकीकरणातील शिक्षणाची बदलती भुमिका–एक अभ्यास | प्रा. डॉ. अशोक लक्ष्मण मोरे | 168 |
| 13 | सायबर गुन्हेगारी | प्रा. अशोक नारायण गायकवाड | 171 |
| 14 | लातूर जिल्हा महसूल प्रशासनातील नाविन्यपूर्ण उपक्रम सुवर्णजयंती राजस्व अभियान | प्रा. डी . बी . जाधव | 174 |
| 15 | शिक्षणाचा मुलभूत हक्क | प्रा. धर्मराज कटके | 184 |
| 16 | जागतिकीकरण आणि उच्च शिक्षण धोरण | डॉ.शिंदे डी.एस. | 188 |
| 17 | जागतिकीकरण आणि सार्वजनिक धोरण | प्रा.हेळंबे हनमंत बालाजी | 191 |




Scanned with CamScanner

# जागतिकीकरण आणि सार्वजनिक धोरण

**प्रा.हेळंबे हनमंत बालाजी**
विभाग प्रमुख,लोकप्रशासन विभाग, र.भ.अट्टल महाविद्यालय,गेवराई जि.बीड

--------------(17)--------------

**प्रस्तावना :**

जागतिकीकरण ही एक प्रक्रिया आहे. यात राष्ट्रीय अर्थ व्यवस्थेचे जागतिक अर्थ व्यवस्थेत परिवर्तन घडून येते त्यामुळे जगातील राष्ट्रात आर्थिक एकात्मता आणि परस्पर अवलंबीत्व वाढते. तसेच या प्रक्रियेत राष्ट्रीय सीमा पार पाडून भांडवल, वस्तु,तंत्रज्ञान, व्यवसाय, कामगार व व्यवस्थापन तंत्र यांची मुक्तपणे देवाण घेवाण याचा समावेश होतो. याचा परिणाम प्रत्येक राष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, आर्थीक घटकांवर पडतो म्हणजेच आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिवर्तन घडून येते. या परिवर्तनाचा प्रभाव सार्वजनिक प्रशासन व धोरणावर पडत असतो. प्रत्येक राष्ट्र - राज्यास कल्याणकारी राज्यापासून कार्यकारी राज्य म्हणून आपली भूमिका पार पाडावी लागते. त्यादृष्टीने आपली धोरणे आखून त्याची पारदर्शकपणे व प्रभावी अंमलबजावणी करावी लागते. कारण जागतिकीकरणाच्या माध्यमातून जागतिक व्यापार- गुंतवणूक व अर्थव्यवस्थेने वेग घेतला तर समृध्दीकडे जाणारे मार्ग आपणास प्राप्त होतील.

**शोध निबंधाचा उद्देश :**

प्रस्तुत शोध निबंधाचे उद्देश पुढील प्रमाणे आहेत :

1. जागतिकीकरण संकल्पनेचा अभ्यास करणे.
2. जागतिकीकरणाच्या अनुकूल व प्रतिकुल परिणामांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक / वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा व द्वितीय स्त्रोतांचा अवलंब करण्यात आला आहे.

**जागतिकीकरण संकल्पना :**

जागतिकीकरण म्हणजे जगातील विविध मानवी संस्कृतीचे एकमेकांशी संवाद, त्यांच्यात व्यापार, व्यवहार पुर्ण होणे होय. जागतिकीकरणाच्या माध्यमातून तंत्रज्ञानाची वाढ व विस्तार होऊन जग एकात्म बनत आहे. तसेच अर्थव्यवस्था वैश्विक बनत आहे. जागतिकीकरण ही संकल्पना समजावून घेतांना व्याख्या अभ्यासने ही उपयुक्त ठरेल.

- **रुसो मोदी** यांच्या मते, "जागतिकीकरण म्हणजे खुली स्पर्धा, नवे तंत्रज्ञान वापरून उत्पादकता आणि उत्पादन वाढविणे तसेच संपुर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करणे आणि वस्तु व सेवांची विक्री करणे होय."

- **जागतिक बँकेच्या** मते, "जागतिकीकरण म्हणजे उपभोग्य वस्तुसह सर्व वस्तुवरील आयात निर्बंध हळूहळू कमी करणे, आयात शुल्क कमी करणे, सार्वजनिकक क्षेत्राचे खाजगीकरण करणे होय."

व्यापारावरील निर्बंध कमी करणे,प्रवाही भांडवल उपलब्धता, सहज उपलब्ध होणारे तंत्रज्ञान, वातावरण निर्मिती हे जागतिकीकरणाचे वैशिष्ट्ये सांगता येतील.

जागतिकीकरणाच्या माध्यमातून जग हे वैश्विक खेडे बनविण्यासाठी श्रमशक्तीलाही महत्व दिले पाहिजे. विकसित व विकसनशिल राष्ट्रांना जागतिकीकरणाचे फायदे, समान मिळणे अपेक्षित आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीमुळे जागतिकीकरण प्रक्रिया अधिक वेगवान बनून अर्थव्यवस्था वैश्विक होण्यास मदत होत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आज प्रत्येक देशाने आपली आर्थिक बंधने सैल करुन जागतिक स्तरावर अर्थव्यवस्था व व्यापार खुला करणे याबरोबरच जागतिक आर्थीक, सामाजिक, राजकिय, प्रशासकीय व्यवहारांना एकत्र गुंफणे महत्त्वपुर्ण आहे. या प्रक्रियेच्या माध्यमातून नविन संस्कृति म्हणजे नव अभिजन वर्ग अस्तित्वात येत आहे. म्हणून असे म्हटले जाते की, जागतिकीकरण आपणाकडून निवडला जाणारा विकल्प राहीला नसून ती एक अपरिहार्य वस्तुस्थिती आहे कारण आर्थिकवृध्दी, विकास व दारिद्रय निर्मुलनाचे जागतिकीकरण एक साधन आहे असे म्हणता येईल.

जागतिकीकरणामुळे सार्वजनिक धोरण प्रक्रियेतील राज्याचा सहभाग कमी होऊन अराजकिय घटकांची भागीदारी (नागरी समाज, खाजगी संस्था, स्वयंसेवी संघटना, बाजारपेठ) वाढलेली आहे. नागरिकांच्या ईच्छा अपेक्षानुसार शासन -



Scanned with CamScanner

प्रशासन व्यवस्थेत बदल अनिवार्य झाले आहेत. हे बदल सार्वजनिक धोरणाच्या माध्यमातून दिसून येतात. भारताचा विचार केला असता नविन आर्थिक धोरणांच्या माध्यमातून खाऊजा संकल्पना स्विकारल्या. त्यातील जागतिकीकरणाद्वारे औद्योगिक क्षेत्रात आमुलाग्र परिवर्तनासाठी औद्योगिक धोरण निर्माण करुन परवाना, गुंतवणूक या दृष्टीने खाजगी क्षेत्राला चालना दिली. आर्थिक धोरणांच्या माध्यमातून आर्थिक सुधारणा व मुक्त अर्थव्यवस्थेला चालना दिली. कृषीक्षेत्राला चालना देण्यासाठी व निर्यात प्रोत्साहनासाठी कृषीधोरण, महिला धोरण, शैक्षणिक क्षेत्रात अमुलाग्र परिवर्तनासाठी शैक्षणिक धोरण, पर्यावरण व जैवविविधता संरक्षण व संवर्धनाच्या दृष्टीने धोरण अशी अनेक धोरणे आखून राबविण्यास सुरुवात झाली.

जागतिकीकरणामुळे शासनाच्या भूमिकेकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलेला आहे. विकासाकडे पाहण्याचा बाजाराधिष्टीत दृष्टीकोने, सरकार, बाजारपेठा व नागरी समाज यांच्यातील सहचर्यामुळे प्रशासनाच्या स्वरुपावर व प्रक्रियेवर प्रभाव पडत आहे. जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय स्पर्धा, मुक्त बाजारपेठ, नागरिकांच्या ईच्छा व मागण्यांचा विचार करुन त्यांच्याकडे संवेदनशीलतेने पाहून लवचिक व समावेशक धोरणे आखून राज्यकारभार चालविण्यावर भर दिला जात आहे. तसेच जागतिकीकरणाच्या युगात शासनास व्यवस्थापकाची भूमिका पार पाडावी लागणार आहे.

जागतिकीकरणाचे अनुकूल व प्रतिकूल परिणाम पहावयास मिळतात. जागतिकीकरणाच्या माध्यमातून व्यापारी व औद्योगिक क्षेत्रासाठी संपुर्ण विश्व ही एक बाजारपेठ निर्माण झाली तसेच राष्ट्राची अर्थव्यवस्था मुक्त होतांना पहावयास मिळते. प्रत्येक राष्ट्रीय सरकारचे आर्थिक व औद्योगिक बंधने संपुष्टात येऊन विदेश व्यापार- व्यवहार नियंत्रण मुक्त होत आहेत अद्ययावत तंत्रज्ञान, साधनसामुग्री व विदेश भांडवल गुंतवणुकीचा उपयोग करण्याची संधी प्राप्त झाली. औद्योगिक स्पर्धेच्या माध्यमातून प्रत्येक राष्ट्र आपल्या सार्वजनिक धोरणात संशोधन व विकासाला प्राधान्य देत आहे त्यातून राष्ट्रविकास व उत्पादकता वाढत आहे. मानवी कौशल्यविकासाला चालना देणारी धोरणे आखली जात आहेत. आर्थिक गतीमानतेमुळे सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन होत आहे. शिक्षण, व्यवसाय व नौकरी ही क्षेत्र खुली होऊन आपल्या आवडीनुसार कोणत्याही राष्ट्रात जाऊन करियर करण्याची संधी प्राप्त होत आहे. तसेच वस्तु-सेवामध्ये स्पर्धात्मकता वाढल्यामुळे गुणवत्ता व कार्यक्षमतेला महत्त्व प्राप्त झालेले आहे. असे अनुकूल परिणाम दिसून येत असले तरीही जागतिकीकरणाचे समाजव्यवस्थेवर होणारे प्रतिकुल परिणाम पहावयास मिळतात जसे आर्थिक विषमतेत वृध्दी होत आहे. म्हणजेच श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत तर गरीब अधिक गरीब होत आहे परिणामी दारिद्र्यरेषेचे प्रमाण वाढत आहे. भारताचा विचार केला तर तेंडूलकर समितीने इस.2009 मध्ये दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचे प्रमाण भारतात 21.9 % इतके नोंदविले होते. 2014 मध्ये सी.रंगराजन् समितीने हे प्रमाण 29.5 % इतके आहे असे म्हटले. कृषी क्षेत्रावरही विपरित परिणाम घडून येत आहे, कामगार कपात, कंत्राटी कर्मचारी असे अनेक प्रतिकुल परिणाम घडून येत आहेत. याचा सार्वजनिक धोरणावर प्रभाव पडतो.

जागतिकीकरणाचे अनुकूल व प्रतिकुल परिणाम दिसून येत असले तरी जागतिकीकरण प्रक्रिया यशस्वीपणे राबविणे महत्वपुर्ण ठरते. जागतिकीकरण प्रक्रिया मानवाच्या सुस्थितीत आणि स्वातंत्र्यात वृध्दी करणारी व प्रत्येक समाजाच्या नागरिकांपर्यंत लोकशाही व विकास पोहचेल अशी असली पाहिजे. ज्यामुळे कोणत्याही विकसनशील राष्ट्राच्या कल्याणकारी धोरणावर प्रतिकुल परिणाम होणार नाही व त्यांना सर्वसमावेशक विकासाची उद्दीष्टय साध्य करता येईल.

**संदर्भसुची :**

1. Datt, Rudara/ Sundaram (2006) Indian Economy, S.Chand & Company- New Delhi.
2. Pratiyogita Darpan (2012): General Study and Economy, Upkar Pub.
3. Sapru R.K. (2016) Public Policy, Sterling Pub.New Delhi.
4. खांडू गजानन (2004) जागतिकीकरण परिणाम आणि पर्याय, अक्षर प्रकाशन मुंबई.
5. दैनिक लोकसत्ता (16 जानेवारी, 2015)



Scanned with CamScanner